नरसोबावाडी नित्यपाठ



SARASW
RACING TOWAR
100 YEARS

ॐ श्रीं विद्या सरस्वत्यै नमः



वीणाधरे विपुलमङ्गलदानशीले, भक्तार्तिनाशिनि विरिञ्चिहरीशवन्द्ये ।
कीर्तिप्रदेऽखिलमनोरथदे महार्हे, विद्याप्रदायिनि सरस्वती नौमी नित्यम् ॥

किंमत रु. 20/-

✲ सरस्वती प्रकाशन ग्रंथ ✲

१) श्री लघु गुरु चरित्र	चि. श्री. कुलकर्णी
२) गाणगापूर माहात्म्य	चि. श्री. कुलकर्णी
३) पंढरपूर माहात्म्य	सरस्वती चि. कुलकर्णी
४) वेंकटेश माहात्म्य	सरस्वती चि. कुलकर्णी
५) तिरुपती माहात्म्य	सरस्वती चि. कुलकर्णी
६) मंत्रालय माहात्म्य	के.बी. कुलकर्णी
७) श्रीदत्त साक्षात्कार	चि.श्री. कुलकर्णी
८) श्री वेंकटेश उपासना	चि.श्री. कुलकर्णी
९) शनिवार व्रत आणि वेंकटेश्वर पूजा विधान	चि.श्री. कुलकर्णी
१०) नरसोबावाडी माहात्म्य	चि.श्री. कुलकर्णी
११) नरसोबावाडी नित्यपाठ	चि.श्री. कुलकर्णी
१२) श्रीनिवास कल्याण	चि.श्री. कुलकर्णी
१३) वर्णचित्र श्रीगुरुचरित्र (प्रासादिक ग्रंथ)	चि.श्री. कुलकर्णी
१४) श्रीगुरु चरित्र कथासार	सरस्वती चि. कुलकर्णी
१५) श्रीवेंकटेश कथासार व सुप्रभातम्	सरस्वती चि. कुलकर्णी
१६) श्री चंद्रशेखर सरस्वती महाराज	सरस्वती चि. कुलकर्णी
१७) श्री सत्य दत्तव्रत	चि. श्री. कुलकर्णी
१८) श्री स्वामी समर्थ अक्कलकोट माहात्म्य	सरस्वती चि. कुलकर्णी
१९) श्री स्वामी समर्थ अक्कलकोट दर्शन	सरस्वती चि. कुलकर्णी
२०) श्री स्वामी समर्थ कथामृत	सरस्वती चि. कुलकर्णी
२१) श्री स्वामी समर्थ सारामृत	सरस्वती चि. कुलकर्णी
२२) श्री स्वामी समर्थ लिलामृत	सरस्वती चि. कुलकर्णी
२३) श्री स्वामी समर्थ नित्यपाठ	सरस्वती चि. कुलकर्णी
२४) श्री स्वामी समर्थ दिव्य नामावली	सरस्वती चि. कुलकर्णी
२५) श्री स्वामी समर्थ स्तोत्र रत्न	सरस्वती चि. कुलकर्णी
२६) श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज्यांच्या गोष्टी	सरस्वती चि. कुलकर्णी
२७) श्रीदत्त स्तोत्र रत्नमाला	चि. श्री. कुलकर्णी
२८) गाणगापूर नित्यपाठ	चि. श्री. कुलकर्णी

नरसोबावाडी नित्यपाठ



संग्राहक - चिदंबर श्रीपादराव कुलकर्णी

सरस्वती प्रकाशन ग्रंथ - ११

प्रकाशक :

सरस्वती प्रकाशन

'गुरुप्रसाद' ८१२/२,

आचार्य गल्ली, शहापूर, बेळगांव.

☎ 0831-2489278

99455 66579

saraswatiprakashan@yahoo.co.in

पृष्ठ	:	४८
किंमत	:	रु. २०/-
सर्व अधिकार	:	प्रकाशक
अक्षर जुळणी	:	नूतन डीटीपी सेंटर, बेळगांव.
मुखपृष्ठ	:	अक्षरा ग्राफिक्स्, बेळगांव

मुद्रक :

चिदंबर आर्ट प्रिंटर्स

'गुरुप्रसाद' ८१२/२,

आचार्य गल्ली, शहापूर,

बेळगांव.

मो. 9448309437

saraswatibgm@gmail.com

भूपाळी १ ली

उठिं उठिं श्रीगजानना । चौदा चौसष्टीच्या जीवना । गौरी शंभूच्या नंदना । नाना भक्तांच्या वासना पुरविशी निर्विघ्ने करुनी ॥धृ०॥ पहा उष:काल जाहला सुरनर आले दर्शनाला। सुरमुनि आले दर्शनाला । ऐकुनि मातेच्या बोला । वेगीं उठले गणराज ॥१॥ किरिट कुंडले मंडित। चतुर्भुजा आयुधे सहित। शेंदूर सर्वांगी शोभत। भाळीं टिळा साजिरा ॥२॥ शिरपेंच हारतुरे झळकती । वस्त्राभरणें विराजती । कंठाभरणे प्रकाशती। चामरे ऋद्धि सिद्ध ढाळिती । पुढें नृत्य करी शारदा ॥३॥ पुष्पे दूर्वा शमि कोमळ । अर्पिता करी कार्यसिद्धी सकळ । अर्पिता कार्यसिद्धी अखिल। ब्रीद्र रक्षक भक्तवत्सल । मूषक वाहन गोजिरें ॥४॥ ऐसा सद्‌गुरु मंगल मूर्ति । त्रिभुवनीं सर्वा आधि अर्चिती । त्रिभुवनी कार्या आधि अर्चिती । पाहुनि शरण गुरुभक्त प्रीती । करि निर्विघ्न कार्य सदा ॥५॥

भूपाळी २ री

उठिं उठिं बा श्रीगुरु । विश्वकाम कल्पतरु । श्रीपाद श्रीदत्तगुरु। चिन्मयमूर्ती श्रीसद्‌गुरु। वांछा पुरवी सकलांची ॥धृ०॥ पहा प्रात:काळ जाहला । अरुणोदय पावला । निशांधकार लोपला । श्रीमुख दावीं स्वामिया ॥१॥ गगनी विमाने दाटली । गंधर्व पन्नगादि सकळीं । चरणीं वाहति पुष्पांजळी । जयजयकार सर्वदा ॥२॥ कर जोडुनि सुरवर किन्नर । नारद तुंबरादि मुनिवर । सनत्कुमार विधि हरिहर । स्तवितो स्वमुखे तुजलागी ॥३॥ विश्वव्यापक प्रतिपालका। अनंतकोटि ब्रह्मांडनायका। अद्‌भूत ऐश्वर्य टिळका ।

विश्वमूर्ति जगद्गुरु ॥४॥ अघटित अगणित घटना । कीर्ती अगाध नारायणा । करिसी शरणागत रक्षणा। प्रसन्नमूर्ती सर्वदा ॥५॥ उठोनियां आदिमूर्ती । प्रसन्न झाले सर्वांप्रति । अभय वरदान प्रीती । अखिलाभिष्ट दिधलें ॥६॥ विश्ववंद्या अनंतशक्ति । मागे गुरुभक्त निश्चिती । चरणसेवा अखंडित। वंशोवंशी रक्षावे ॥७॥ उठि ॥

भूपाळी ३ री

उठिं उठिं श्रीदत्तात्रेया । श्रीपाद श्रीवल्लभ सदया । श्रीनृसिंह सरस्वती गुरुवर्या । दर्शन देई भक्तासी ॥धृ०॥ पंचपंच उष:काल जाहला । अरुणोदय सप्तपंच घटिला । अष्टम पंचप्रात:काल । उदया पावे रवि पूर्ण ॥१॥ आले अमरेंद्रादि अमर । संतसाधु मुनिवर । समग्र आले नारी-नर। काकड आरती पाहावया ॥२॥ नमितां पूर्ण मनोरथ होती । त्रिविध ताप समूळ हरती । पूर्वज समस्त उद्धरती । काकड आरती देखिलिया ॥३॥ वेगे उठतां सद्गुरु मूर्ती। सकळिक पादांबुज वंदिती । स्तवनी ध्याती ओवाळिती । विश्वव्यापक परमात्मा ॥४॥ गुरु त्रिमूर्ती आश्रम घेऊन । तरुवरी ब्रीद्ररक्षणार्थ राहून । स्मरतां तारिसी जन संपूर्ण । रक्षिसी गुरुभक्त सर्वदा ॥५॥

भूपाळी ४ थी

उठि सत्वर प्रभूवरा यतिवरा। स्नानासि उशिर झाला। देवा स्नानासि उशिर झाला। पाहे स्वामि दयाळा। त्रिभुवनपाळा अरुणोदय झाला ॥धृ०॥ कर जोडुनि सुर नर । मुनिवर उभे महाद्वारी । देवा उभे महाद्वारी । द्यावें दर्शन श्रीहरी । नरहरी

सद्गुरु अवधारी ॥१॥ सद्गुरुमूर्ती अनंत कीर्ती । श्रुति वर्णिती पाही । स्मरणीं तारक निजसुख दायक । भक्तां लवलाहीं ॥२॥ ऐकूनि वाणी चिन्मय खाणी । उठता विश्वात्मक तारु । सद्गुरु विश्वात्मक तारूं। सर्वहि ध्याती वंदन करिती । गुरुवर कल्पतरु ॥३॥ काषायांबर भस्म भूषणों। धारण रुद्राक्षाभरणें । विलसति रुद्राक्षाभरणें । दंड- कमंडलु- गदा- पद्म- शंख- चक्र शोभति पूर्णे ॥४॥ किरिट-कुंडल-मंडित षड्भुजमूर्ति कांति सांवळी । प्रभूची मूर्ति कांति सावळी । नमिता श्रीगुरु भक्त । दत्त सतत पदी नांदवि तात्काळीं ॥५॥ उठि० ॥५॥

भूपाळी ५ वी

उठिं उठिं बा दत्तात्रया । भानु करूं पाहे उदया । करूनि दीनावरति दया । चरण दावि वेगेसी ॥धृ०॥ मंद वायू हा सुटला । पक्षी करिताति किलबिला । दीपवर्ण शुभ्र जाहला। पूर्व दिशा उजळली ॥१॥ करुनी कृष्णेचे सुस्नान। घेऊनी पूजेचे सामान । सकळा लागलेसे ध्यान। कपाट (द्वार) केव्हा उघडेल ॥२॥ आले देवादिक दर्शना। त्यांच्या पुरवाव्या वासना । संतोषोनी आपुल्या मना । तीर्थप्रसाद अर्पावा ॥३॥ गुरु त्रिमूर्ति साचार । करिसी भक्तांचा उद्धार । म्हणुनि धरिलासे अवतार । भक्तां संकटि संरक्षिसी ॥४॥ म्हणूनि राम लागे पायी । हेचि इच्छा सर्व देई । तूंचि माझी बाप माई । सांभाळावे बाळका ॥५॥

(नंतर स्नान करुन हक्कदार पुजारी येऊन श्रीचे दार उघडतो व काकडारतीस सुरुवात होते.)

काकड आरती

पंचप्राण काकड आरती तत्त्वात्मक ज्योती । लावुनी तत्त्वात्मक ज्योती । ओवाळिला गुरुत्रयमूर्ति । ओवाळिला श्रीत्रयमूर्ति । परमात्मा प्रीती ॥ धृ०॥ ओवाळूं आरती माझ्या सद्गुरुनाथा । स्वामी श्रीगुरुनाथा । शरण मी आलो तुज । श्रीपदी ठेवियला माथा ॥१॥ कृष्णा सुपंचगंगा अनादि संगमी। नरहरी अनादि संगमी । राहे गुरुवर तरुतळी। राहे यतिवर तरुतळी । तो हा माझा कुलस्वामी ॥२॥ द्वारीं चौघडा वाजे वाजंत्री वाजती । कर्णे वाजंत्री वाजतीं । नाना घोषे गर्जती । नाना वाद्ये गर्जत । भक्त स्वानंदे स्तविती ॥३॥ इंद्रादि सुरवर पन्नग दर्शनासि येति। श्रीचे दर्शनासि येती । नारद मुनिवर किन्नर तुंबर सुस्वर आळविती ॥४॥ पाहुनि सिंहासनी आदिमूर्ती सांवळी । चिन्मय आदिमूर्ती सांवळी। श्रीगुरुभक्त तन्मय श्रीगुरुभक्त निर्भय ।श्रीपदि ओवाळी ओवाळू ० ॥५॥

अथ ध्यानाष्टक

त्रिभुवन पूर्ण प्रकाशा । सर्वेश्वर जगदीशा । दत्तात्रय दत्तात्रय जय त्रैलोक्यपते ॥१॥ परमात्मा परंज्योति । सद्गुरु श्रीत्रिमूर्ती । दत्ता० ॥२॥ मुनिजन मानस चंद्रा । गुरुवर्य धैर्य समुद्रा । दत्ता० ॥३॥ निर्गुण निर्विकार । पूर्णानंदावतार ॥ दत्ता० ॥४॥ अवतार श्रीवल्लभ । नरहरी त्रिभुवनि दुर्लभ ॥दत्ता० ॥५॥ करुणानिधी कमलाक्ष॥ त्रिगुणात्मक यतिदक्षा ॥दत्ता० ॥६॥ काषायांबर वसना । सुभस्मरुद्राक्षाभरणा ॥ दत्ता०॥७॥ दंडक-मंडलु करधर। षड्विध आयुध परिकर ॥ दत्ता० ॥८॥ किरिट कुंडल मंडित ।

षड्भुज मूर्ति विराजित ॥ दत्ता०॥९॥ कृष्णासंगमी तारक । तरुतळी श्रीमत्साह्यक ॥ दत्ता०॥१०॥ दुष्कृत कृत गुरुभक्ता। तव पादि कृत मुक्त ॥ दत्ता०॥११॥

शरणाष्टक

(चाल - शिवहरशंकर गौरीशंकर)

दत्तात्रेया तव शरणं । दत्तन्नाथा तव शरणं । त्रिगुणात्मका त्रिगुणातीता त्रिभुवन पालक तव शरणं ॥१॥ शाश्वत मूर्ते तव शरणं । श्याम सुंदरा तव शरणं । शेषाभरणा शेषभूषणा शेषशायी गुरु तव शरणं ॥२॥ षड्भूजमूर्ते तव शरणं । षड्भुज यतिवर तव शरणं । दंड -कमंडलु -गदा-पद्म-शंख-चक्रधर तव शरणं ॥३॥ करुणानिधे तव शरणं । करुणासागर तव शरणं । श्रीपाद श्रीवल्लभ गुरुवर नृसिंहसरस्वती तव शरणं ॥४॥ श्रीगुरुनाथा तव शरणं । सद्गुरुनाथा तव शरणं । कृष्णासंगमी तरुतलवासी भक्तवत्सला तव शरणं ॥५॥ कृपामूर्ते तव शरणं । कृपासागरा तव शरणं । कृपाकटाक्षा कृपावलोकन कृपानिधे प्रभू तव शरणं ॥६॥ कालांतका तव शरणं । कालनाशका तव शरणं । पूर्णानंदा पूर्णपरेशा पुराण पुरुषा तव शरणं ॥७॥ जगदीशा तव शरण । जगन्नाथा तव शरणं। जगत्पालका जगदाधीशा जगदोद्धरा तव शरणं ॥८॥ अखिलांतका तव शरणं । अखिलैश्वर्या तव शरणं । भक्तपिया वज्रपंजरा प्रसन्नवक्त्रा तव शरणं ॥९॥ दिगंबरा तव शरणं । दीनदयाघन तव शरणं । दीननाथा दीनदयाळा दीनोद्धारा तव शरणं ॥१०॥ तपोमूर्ते तव शरणं । तेजोराशी तव शरणं । ब्रह्मानंदा ब्रह्मसनातना ब्रह्ममोहना तव शरणं

॥११॥ विश्वात्मका तव शरणं । विश्वरक्षका तव शरणं । विश्वंभरा विश्वजीवना विश्व परात्पर तव शरणं ॥१२॥ विघ्नांतका तव शरणं । विघ्न नाशका तव शरणं । प्रणवातीता प्रेमवर्धना प्रकाशमूर्ते तव शरणं ॥१३॥ निजानंदा तव शरणं। निजपददायक तव शरणं । नित्यनिरंजन निराकार निराधारा तव शरणं ॥१४॥ चिद्घनमूर्ते तव शरणं । चिदाकारा तव शरणं । चिदात्म रूपा चिदानंदा चित्सुखकंदा तव शरणं ॥१५॥ अनादिमूर्ते तव शरणं। अखिलावतारा तव शरणं । अनंतकोटी ब्रह्मांड नायका अघटित घटना तव शरणं ॥१६॥ भक्तोद्धारा तव शरणं । भक्तरक्षका तव शरणं । भक्तानुग्रह गुरुभक्तप्रिय पतितोद्धारा तव शरणं ॥१७॥

(काकड आरती झाल्यावर प्रातःकालची पूजा होते; दोन प्रहरी षोडशोपचार महापूजा होते व सायंकाळी धूप-दीप-नैवेद्य झाल्यावर आरत्यांस आरंभ होतो.)

नित्यारत्या

आरती १ ली

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा । नेति नेति शब्द न ये अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधी न ये ध्याना ॥१॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुदत्ता । आरती ओवाळीता । हरली भवचिंता ॥धृ०॥ सबाह्य अभ्यंतरी तू एकदत्ता । अभाग्यासी कैची न तेथें कळे ही माता । पराही परतली कैचा हा हेत । जन्म मरणाचा पुरलासे अंत ॥ जय० ॥२॥ दत्त येऊनीयां उभा ठाकला । सद्भावे साष्टांगेसी प्रणिपात केला । प्रसन्न होऊनी आशीर्वाद

दिधला । जन्म मरणाचा फेरा चुकविला ॥३॥ दत्त दत्त ऐसे लागले ध्यान । हारपले मन झाले उन्मन। मी तूं पणाची झाली बोळवण ।एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान ॥४॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुदत्ता। आरती ओवाळिता हरली भवचिंता ॥

आरती २ री

श्रीकृष्णातटनिकटे यत्पाद युगलं । नरसिंह सरस्वत्या भुवने कृपालं । स्वामी सेवक वांछ परिपूर्ण यालं । यशो दुंबरमूले निवसे त्रिस्थलं । जयदेव जयदेव जय जय भो गुरुमूर्ते। नरसिंह सरस्वती शरणागतमूर्ते ॥ जय० ॥१॥ वस्त्रं दंडा पात्रं कौपिनं कटिसूत्रं । नरसिंह सरस्वती सामुग्री तंत्रं। शरणागत जनता महाभाग्यैकमित्रं । भ्रमयन्न विषयेछा स्वात्मारामं चित्रं ॥२॥भवयय नरसिंह सरस्वती गात्रं ।धृत रुद्राक्षमाला लंबमंभोजनेत्रं । निजपीठामंतस्य मनोरथ पात्रं। पंचार्तिक्यासमयें सुप्रसन्नवक्त्रं ॥३॥ यन्नायनांबुजाग्रे अमरेश्वरशूलि । दक्षिणभागे कृष्णा पंचगंगा कूली । यद्धामे शुक्लतीर्थ शुद्धः कपाली । यन्निकटे वसति खलु दीपावली ॥४॥ यस्य पुरते नित्यं हृदय:तिष्ठति । अज्ञद्येन हि नोंदे वो किं कर्तव्यमिती ।सदेहाबद्धांजुलय: किम्वो तुष्यंति दासस्य वद नानामोहस्तुती ॥५॥ यच्चरणांबुज युग्मेऽखिल तीर्थ माला। गंगा गोमती गोदा नर्मदा विशाला।भीमा तापी यमुना तुंगभद्रा सकळा । प्रतिका कमला त्या सवती सकळा ॥६॥ ध्यायेतामला नरसिंह मूर्ती । विधी विष्णु शंभू नामैकैकाकृति। वामे दक्षिणभागे दंड पात्रस्थिती:। काषायांबरयुग्मं परितोपधाति ॥७॥ यत्पादुका दर्शनं तापत्रय शयनं अनेक

निज भक्तः पुरकीर्ती मानं । निजभक्त वर्गस्याभीष्ट कारणं । मुख सूर्य तपस्या पूर्ण चंद्रकिरणं ॥८॥ इत्यं ज्योतिर्नरहरी उज्वलिता माया। हंकार सुस्नेहं देवहर्ति काया । शरणागत मां पालय कृपया। माधवसुत चिंतामणी शरणं तव पाया ॥जय॥९॥

आरती ३ री

कृष्णापंचगंगा संगम निजस्थान । चरित्र दाऊनि केले गाणगापुरी गमन । तेथे भक्त श्रेष्ठ त्रिविक्रमयति जाण । विश्वरूपे तया दिधले दर्शन । जयदेव जयदेव जय श्रीगुरुदत्ता। नरसिंह सरस्वती जय विश्वंभरितां ॥धृ०॥ वंध्यांसाठी वर्षे पुत्रनिधान । मृत ब्राह्मण उठविला तीर्थ शिंपुन । वांझ महिषी काढवी दुग्ध दोहून । अत्यंजाचे वदनीं निगम संपूर्ण ॥जय०॥ शुष्क काष्टी पल्लव लावुनि लवलाही । कुष्टी ब्राह्मण केला शुद्ध निजदेही । अभिनव लीला (महिमा) ज्याची वर्णू मी काई । म्लेंच्छ राजा येऊनी वंदितसे पायीं ॥जय०॥ दीपावळीचे दिवशी भक्त येऊनी । आठहि जण ठेविती मस्तक तव चरणीं । आठहि ग्रामी भिक्षा केली ते दिनी । निमिषमात्रे नेला तंतुक शिवस्थानीं ॥जय०॥ ऐसे चरित्र दावुनि जड मूढ उद्धरिले । भक्तवत्सल ब्रीद जगती मिरवीले । अपार महिमा म्हणऊनि वेदश्रुती बोले । गंगाधरतनय वंदी पाऊले ॥जय०॥

(आरत्या सुरू असताना श्रीच्या उत्सवमूर्तीस पोषाख करुन भालदार, चोपदारादि सरंजामनिशीं समारंभाने श्री नारायण स्वामींच्या देवळांतून आणतात आणि श्रीच्या

उजव्या बाजूस सिंहासनावर बसवितात.)

आरती ४ थी

अयं कृष्णारूपं वेण्या शिवरूपं । कोशी पंचगंगा षट्कुल रहिवासं । प्रज्ञा कल्पद्रुम स्थिर आत्मा गुण रूपं । दत्तं देशिक वरदं त्रिगुणात्मकमीशं । जयदेव जयदेव जय देशिक तेजोमय आनंद योगिन् । सद्गुरुराज स्वामिन् । श्रीगुरुराज स्वामिन् । करुणामृत भोगिन् ।। जयदेव जयदेव ।।१।। भवनिधी तरणोपायं यति मज्जन मननं । साधक सिद्धक रूपं आत्मपद संलग्नं । त्वमेव करुणामात्रं तीर्थ गुणगहनं । प्रगटेष्ट प्रकाशित श्रीपाद संलग्न । जयदेव० ।।२।। ब्रह्मज्ञानं यतिवर त्वपाद गति कार्यं । माया मानुषवेषं यतीवर गंभीरं । नामस्मरण नामधारक कृतकार्यं । सत्यं ज्ञानमनंत यतिलीलावर्णं ।।जयदेव० ।।३।।

आरती ५ वी

स्वामी नरसिंहसरस्वतीगे । गुरुमूर्तीगे । यतिवर्यागे मंगल। कामित कामफलतृप्तीगे मंगल । निरूपम नित्य निरूमायागे मंगल । निर्वाण व्यक्ती यतिरायागेमंगल ।। स्वामी० ।।१।। भक्तजनर कल्पवृक्षागे मंगल । भक्तिइंद्र भजिसुव मोक्षागे मंगल ।।स्वामी० ।।२।। भीमा गंधर्व पुरवा सागे मंगल । भीमाशंकर गुरुवेषागे मंगल ।।स्वामी० ।।३।।

आरती ६ वी

श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर भगवन्नगुरुकीर्ते । नाना नरसुरवरगण संस्तुत करुणामयमुर्ते । नित्यानंद समाधि समाहित मानस परिपूर्ते । मुनिजन मानस हंस परात्पर जय जय गुरुमूर्ते ।। श्रीपाद० ।।१।। स्वर्गस्थितीलयकारण शंकर

परिपूर्ण स्फूर्ते । चरण युगे भूसुरगण पालक दारित आवर्ते। दुरित विनाशन कृष्णा तट मठ विहरण परिपूर्ते । कल्पतरू औदुंबर छाये निवसिष्टा पूर्ते ॥ श्रीपाद० ॥२॥ मा मती कृपण मनाथं जीवय भुवन व्यावर्ते। करुणाकर मामूद्धर पतीतं गुरु मायागर्ते । सद्‌गुरु त्वत्पदशेखर तीर्थ सद्‌गुरु त्वत्पद व्यावर्तें। भारतीनाथ यति प्रति पालय भवभय पाशार्ते ॥ श्रीपाद ॥३॥

आरती ७ वी

कृष्णपंचगंगासंगम बहु थोर । उत्तरवाहिनी शुक्ल तीर्थ अपार । औदुंबर सावित्री पुष्ठा निर्धार । तेथे स्वपदी तुझे आनंदसार ॥१॥ जयदेव जयदेव जय सद्‌गुरुवर्या । नरसिंह सरस्वती न कळे तवचर्या ॥धृ०॥ परमहंस योगी यतिवर संन्यासी । सिद्धनाथ पूजिती वर्णित महिमेसी । अनेक कोटीतीर्थ गुरुचरणांपासी । वंदुनि सेवा करती पावति यशमुक्ति ॥२॥ प्रत्यक्ष कलियुगी यात्रा भरत । माघ वद्य प्रतिपदा आनंद होत । हरिकीर्तन करित जे साधुजन संत। ऐसे उद्धवलिंग हृदय प्रकटत ॥३॥

(आरती झाल्यानंतर पुष्पहारादिकांनी अलंकृत केलेली उत्सवमूर्ती पालखीत बसवून सर्व सरंजामानिशी तिची मिरवणूक जयजयकार करुन सुरु करितात.मंदिरा सभोवती पालखीच्या तीन प्रदक्षिणा घालतात.)

प्रदक्षिणा १ ली

(देवासमोर)

काषायवस्त्रं करदंड धारिणं । कमंडलु पद्मकरेण शंखं।

चक्रंगदा भूषित भूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥१॥ औदुंबर: कल्पवृक्ष: कामधेनुश्च संगम: । चिंतामणी गुरो: पादौ दुर्लभौ भुवनत्रये ॥धृ०॥ कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनंदन: । द्वापरे रामकृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभ: ॥२॥

पद (राग-कालंगडा, ताल -धुमाळी)

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची । धन्य धन्य हो प्रदक्षिणा श्रीगुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥धृ० ॥ पदोपदी जाहल्या अपार पुण्यांच्या राशीं। सर्वही तीर्थे घडली आम्हां आदिकरूनि काशी ॥ धन्य० ॥१॥ मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती । नाम संकीर्तनी नित्यानंदे नाचती ॥ धन्य ॥२॥ कोटि ब्रह्महत्या हरती करिता दंडवत। लोटांगण घालिता मोक्ष लागे पायास ॥धन्य० ॥३॥ गुरुभजनाचा महिमा अगम्य निगमागमासी। अनुभव जे जाणती ते गुरुपदिचे अभिसाषी ॥ धन्य० ॥४॥ प्रदक्षिणा करुनि देह भावें वाहिला । श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला । धन्य धन्यहो प्रदक्षिणा ॥५॥

(दक्षिणद्वारांत पालखी आल्यावर)

अष्टक

होता ब्राह्मण भार्यया सहपुरा आला तिच्या उदरा । मौनत्वे करितो विचित्र मग जे नाना विलासे हरा। मौजीबंधन जालिया तदुपुरी काशीपुरी चालिला । तो हा सद्गुरुराज श्रीनरहरि औदुंबरी राहिला ॥१॥

(जान्हवीसमोर पालखी आल्यावर)

गंगास्नान निरंतरा कालत्रया साधुनी । चिन्मुद्रा करितो

दृढासनि वसे काशीस ध्यातो मुनी । येती थोर यति नमुनि म्हणती आम्हांसी तो आगळा । तो हा सद्‌गुरुराज श्रीनरहरी औदुंबरी राहिला ॥२॥

(उत्तरद्वारांत पालखी आल्यावर)

वृद्ध कृष्णसरस्वती यतिवर सर्वासि मानी भला । त्यातें वंदुनि बोलती निज गुजा संन्यास देणे मला । चातुर्थाश्रम घेऊनी गुरुचिये आज्ञे स्वयं घेतला । तो हा सद्‌गुरुराज श्रीनरहरी औदुंबरी राहिला ॥३॥

प्रदक्षिणा २ री

(श्रीसमोर पालखी आल्यावर)

काषायांबर दंडहस्तकमली कमंडलू मेखला भस्मोद्धोलित केवळा शशिकला रुद्राक्षमाळा गळां । तीर्थाला करुनि पुनीत सकळां पृथ्वीवरी चालला । तो हा सद्‌गुरुराज श्रीनरहरी औदुंबरी राहिला ॥४॥

(दक्षिणद्वारांत पालखी आल्यावर)

मेरू सव्य करूनियां मनगती जातो कसा निर्गुणी । मायामोह त्यजूनि निर्मळ मने तीर्थे बहु वंदुनि । सुश्रेत्रापूर गाणगाप्रति गुरु तात्काळ जो पातला । तो हा सद्‌गुरुराज श्रीनरहरी औदुंबरी राहिला ॥५॥

(जान्हवीसमोर पालखी आल्यावर)

स्थाने उत्तम शोधुनी त्रिभुवनीं नाही वसे पाहुनी । आला सत्वर पातला कुरुपुरीं एकांत राहे वनी । रजके जाऊनि वंदिता प्रतिदिनीं राज्यापदी स्थापिला । तो हा सद्‌गुरुराज श्रीनरहरी औदुंबरी राहिला ॥६॥

(उत्तरद्वारांत पालखी आल्यावर)

होती ब्राह्मणी साठ वर्ष तिजसी कन्याकुमारी दिला वांझे महिषीस दुभविले फुलविले काष्टी किडे खादिला । अत्यंजा मुखि वेदही पढविला त्रिविक्रमा भेटला । तो हा सद्गुरुराज श्रीनरहरी औदुंबरी राहिला ।।७।।

प्रदक्षिणा ३ री

(श्रीसमोर पालखी आल्यावर)

त्रैमूर्ती अवतार हा यतिवरा वेषाधरी मानवा । त्यासी जे नरलोक मूढ म्हणती होई यमा बांधवा । म्हणे कंभज वंशि तो गुरुपदी कृष्णातटी पाहिला । तो हा सद्गुरुराज श्रीनरहरी औदुंबरी राहिला ।।८।। एवं हे गुरु अष्टक प्रतिदिनीं त्रिकाळ जें पाठती । पापे नासती पुण्य पावती अती कीर्ती बहु वाढती। विद्या गोधन संतती दृढमती सत्त्वें गुणे राहती। एवं नित्य करिती जे गुरुस्तुती अंती गती पावती ।।९।।

करुणा त्रिपदी पद १ ले

(चाल - उद्धवा शांतवन)

शांतहो श्रीगुरुदत्ता मम चित्ता शमवी आतां । तूं केवळ माता जनिंता सर्वथा तूं हितकर्ता । तूं आप्त-स्वजन् भ्राता सर्वथा तूंची त्राता० ।।चाल।। भयकर्ता तूं भयहर्ता । दंडधरिता तूं परिपाता । तुजवांचुनि न दुजी वार्ता । तूं आता आश्रय दत्ता ।।१ ।। अपराधास्तव गुरुनाथा । जरी दंडा धरिसी यथार्था। तरी आम्ही गाऊनि गाथा । तव चरणी नमवू माथा ।।चाल।। तूं तथापि दंडीसी देवा । कोणाचा मग करु धावा । सोडविता दुसरा तेव्हां । कोण दत्ता आम्हां त्राता ।।२।। तूं नटसा होऊनि

कोपी ।दंडिताहि आम्ही पापी। पुनरपिंही चुकत तथापि । आम्हांवरी नच संतापी। चाल ।। गच्छत:स्खलनं क्वापि । असे मानुनि नच होकोपी। निज कृपा लेशा ओपी । आम्हांवरी तूं भगवंता ॥३॥ तव पदरी असतां ताता । आडमार्गी पाऊल पडतां सांभाळुनि मार्गावरता । आणिता न दुजा त्राता ।। चाल ।। निज बिरुदा आणुनि चित्ता । तूं पतितपावना दत्ता । वळे आतां आम्हां वरतां। करुणाघन तूं गुरुनाथा ॥४॥ सहकुटुंब सहपरिवार। दास आम्ही हे घरदार । तव पदी अर्पू असार। संसाराहित हा भार ।।चाल।।परिहरिसी करुणा सिंधो । तूं दीननाथा सुबंधो। आम्हां अघलेशन बाधो। वासुदेव प्रार्थीत दत्ता ॥५॥

(दक्षिण द्वारांत पालखी आल्यावर)

करुणा त्रिपदी पद २ रे

(चाल - इस तन धन की)

श्रीगुरुदत्ता जय भगवंता । तें मन निष्ठूर न करी आता ॥धृ०॥ चोरें द्विजासी मारिता मन जे । कळवळले ते कळवळो आतां ।। श्रीगुरु ॥१॥ पोटशूळाने द्विज तडफडता। कळकळले तें कळकळो आतां ॥२॥ द्विजसुत मरता वळले तें मन हो कीं उदासीन न वळे आतां ॥३॥ सती पती मरतां काकुळति येतां । वळलें तें मन न वळे आतां ॥४॥ श्रीगुरु दत्ता त्यजि निष्ठुरता। कोमल चित्ता वळवी आतां ॥५॥

करुणा त्रिपदी पद ३ रे

(चाल - इस तन धन की)

जय करुणाघन निजजन जीवन ।। अनसूयानंदन पाहि

जनार्दन ॥धृ०॥ निज अपराधे उपराटि दृष्टि । होऊनि पोटी भय धरूं पावन ॥१॥ तूं करुणाकर कधीं आम्हांवर रुससि न किंकर वरद कृपाघन ॥२॥ वारी अपराध तूं मायबाप । तव मनी कोप लेश न वामन ॥३॥ बालकापराधा गणिजरि माता। तरि कोण त्राता देईल जीवन ॥४॥ प्रार्थी वासुदेव पदि ठेवी भाव। पदिं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥५॥

अष्टक (शिखरिणी)

अनेक जन्मींचा निज सुकृत ठेवा जरि असे । भवाब्धीचें ठायी तरि तव पदांभोरुह दिसे । जनोद्धारासाठी भगवदवतार प्रगटला । दयासिंधो आता नरहरि गुरु पाव मजला ॥१॥ कुरुंदवाडग्रामी उभय जल गा संगम वर्नी । महासिद्धस्थानी गहन तप केले वरमुनी । जया योगाभ्यासें निज तपनभावे तपविला । दयासिंधो आतां नरहरी गुरु पाव मजला ॥२॥ पतीताच्या तोंडे करुनी निगमाते पढविलें । महीषी वांझे ते अमृत शिवहस्तें दुभविले । किडेल्या काष्ठाचा तरु करुनी तोही फुलविला । दयासिंधो आतां नरहरि गुरु पाव मजला ॥३॥

(जान्हवींसमोर पालखी आल्यावर)

अनुष्ठानी माझे मन बसत नाहीं म्हणुनियां । नको होऊं स्वामी कठिण मन करितां त्यजुनियां । न गुंतावे कोठे तव शपथ घालीन तुजला । दयासिंधो आता ॥४॥अकाली मेघातें मुख पसरितां चातक म्हणे । न देसी तूं बिंदू त्वरित मजला जाण मरणें।नुपेक्षी तूं दाता गंगाजळ देता। निववली दयासिंधो आता ॥५॥ निजानुष्ठानाचे तप फळ न माये त्रिभुवनी । तदा झाली कैसी अवचित दया ते तुज मनीं ।

पतिताला पाहूं सकळ दुरितात्माचि कळला ।। दयासिंधो आता ।।६ ।।

(उत्तर द्वारांत पालखी आल्यावर)

बहू म्यां वर्णावे तरि त्वरित बा रे शमविले । सुरेंद्रा इंद्राला परम गुरुचा पार न कळे । अनेक जिव्हांचा फणिवर कीं तोही चिरविला ।।दया० ।।७ ।। नृसिंहस्वामी हें पठण करिता अष्टक तुझें । नसे माझे देही भव दुरित दावानल विझे । दरिद्राची वार्ता तडफडत गेली रिपुधरा । निजानंदे डोले सुखरूप असे सेवक बरा ।।८ ।।

पद

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारि तारि मजला । दयाळा तारि तारि मजला । श्रमलों मी या प्रपंच धामी आलो शरण तुला ।।धृ०।। करिता अटाटी प्रपंच अवघा दिसतो मिथ्यत्व । दयाळा दिसतो मिथ्यत्व । म्हणवुनि भजन तुझे मज देवा भासे सत्यत्व ।।श्रीपाद० ।। किंचित मात्रा कृपा करि मज वरी करिसी उदार मन।दयाळा करिसी उदार मन। चुकलो मी या विषयसुखांच्या आहारांतून जाण ।। श्रीपाद० ।। कृष्णातटनिकटी जो विलसे औदुंबर छायीं दयाळा औदुंबर छायी । हंस परात्पर भारति नायक लीन तुझें पायी ।।३ ।।

(श्रीसमोर पालखी आल्यावर)

अष्टक

(शार्दूल विक्रीडित)

आतां घ्यावे मुरारी विपुल यश हरी कीर्ती होईल भारी ।

कृष्णातीरानुसारी नमुनि कर शिरी बैसली बा मुरारी। नाना संपत्तिकारी पतितजन पुरी किंकरे नाथकारी । दिनांच्या हृद्विहारी विचार नरहरी सर्व गर्वापहारी ॥१॥ ऐसे संकट वाटले तरि भलें झालें हरी आपलें । यथा आणुनि गोविले मृगजळी आशातपी बांधीले । केले कर्म न चुकले विधिबळें ब्रह्मादिकी रेखिलें । माते पाहुनि हांसले नरहरी कोठें तुझीं पाऊलें ॥२॥ हे लज्जा धरणें विचित्र फिरणें सेवोनि नारायणें । स्वस्थांत: करणें करोनि बसणे सिंहासनी आपणे । कर्माची गति भाजणे सुनिवणे षड्वैरि संशोषणें। हें सामर्थ्य असोनि कां नरहरी ठेवूनि घेसी उणें ॥३॥ सामर्थ्ये बहु ऐकिली सुफळली डंका तुझी गाजली । दाता एक कलींत सद्‌गुरु बली ऐसे वदे त्रिस्थळी। ते सत्ता सरली तुला विसरली किंवा तुवा ध्वंसिली । कीं पीडस्तव झांकली म्हणुनियां झालो आम्हीं निर्बळी ॥४॥ हे शंका तुजला गुरु न मजला हांसे बुरा वा भला । पोटी घाली ममापराध सकळां ते दावि सच्चित्कळा । बाळाचा किरळा पिता सुपुतळा सोशील कीं तो सुळा । गोपाळा मजलागि चित्घनकळा आनंद हो वर्षला ॥५॥

पद

(राग- देस, ताल-धुमाळी)

सांगावे । कवण्या ठाया जावे । कवणातें स्मरावें कैसे काय करावे । कवण्यापरि मी रहावें । कवण येऊनि कुरुंदवाडीं स्वामी ते मिळवावे । या हारी जेवावें व्यवहारी । बोलावे संसारी । घालुनि अंगीकारी प्रतिपाळीसी जो निर्धारी । केला जो निज निश्चत स्वामी कोठे तो अवधारी । या रानी। माझी

करुणावाणी । काया कष्टी प्राणी । ऐकुनि घेशिल कानी । देशिल सौख्य निधानी। संकट होऊनी मूर्च्छित असतां पाजिल कवणा पाणी। त्या वेळां सत्पुरुषांचा मेळा । पाहतसे निज डोळा। लाविसी भस्म कपाळा। सांडी भय तूं बाळा। श्रीपाद श्रीवल्लभम्हणती अभय तुज गोपाळ।। सांगावे० ।।१ ।।

पद

औदुंबरी देव देखिला । भूसुरवृंदा तोष जाहला । नित्योत्सवे देव तोषला ।। चाल ।। निरांजनविधी होते समयी विबुधांचा हा मेळा । भावभावातीत विराजित मनुजाचा हा पाळा । मोक्षादिक सुकृतांचे पावन देखतसे निज डोळां । देवांधिप हा श्रीगुरु नरहरि, तारिल आपुल्या बाळां ।। देव० ।।१ ।। दयानिधि देव भेटला । तापत्रय बंध तुटला । आनंदाचा पूर लोटला । भूतप्रेत पिशाच्चगणावरि घालितसे निज घाला । भावें सेवा करितां पावन मुक्त करी मनुजाला । सदय हृदय सद्गुरु हा नरहरि वैकुंठाधिप आला ।। देव० ।।२ ।। कृष्णातीरी व्यक्त जाहला । अलभ्य लाभ लाभला भला । कल्पतरू पूर्ण फुलला । श्रीपाद श्रीवल्लभ गुरुवर पावतसे सकळाला । चरणांबुज देऊनिया कलिमल दूर करि भवताला । हंसपरातत्पर भारतिनायक मुक्त करी दासाला ।।देव० ।।३ ।।

अघोरसंकटनाशनस्तोत्रम् ।

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव । श्रीदत्तास्मान् पाहि देवाधिदेव।। भावग्राह्य क्लेशहारिन् सुकीर्ते । घोरात्कष्टा दुद्धरास्मान्नमस्ते ।।१ ।। त्वं नो माता त्वं पिताप्तोऽधिपस्त्वं। त्राता

योगक्षेम कृत्सद्गुरुस्त्वम् ।। त्वं सर्वस्वं नोऽप्रभो विश्वमूर्ते घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।२।। पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं भीतिं क्लेशं त्वं हराशुत्व दैन्यम् ।। त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।३।। नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता त्वत्तो देव त्वं शरण्योकहर्ता । कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते । घोरात्कष्टा दुद्धरास्मान्नमस्ते ।।४।। धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं सत्सं गाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् । भावासक्तिं चाखिलानंद मूर्ते घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।५।। श्लोकपंचक मेतद्यो लोकमंगल वर्धनम् । प्रपठेन्नियतो भक्त्या सः श्रीदत्तप्रियो भवेत् ।।६।।

(नंतर आरती व प्रार्थना होऊन उत्सवमूर्तीस पालखीतून उचलून सिंहासनावर बसवितात व मंत्रपुष्प झाल्यावर श्रींची स्वारी समारंभाने परत नारायणस्वामींच्या देवळात जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेपासून आश्विन शुद्ध नवमीपर्यंत पालखी बंद असते. त्या वेळी व पालखी नसेल त्यावेळी इंदुकोटी स्तोत्र म्हणतात.)

इंदुकोटि स्तोत्र

(चाल - पंच चामर)

इंदुकोटि तेजकीर्ण सिंधुभक्त वत्सलं ।। नंदनात्रिसुनदत्त् इंदिराक्ष श्रीगुरुम् ।। गंधमाल्य अक्षतादि वृंददेव वंदितं ।। वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि मां ।।वंद०१।। मायपाश अंधकार छाय दूर भास्करं ।। आयताक्षि पाहि श्रियावल्लभेश नायकं ।। सेव्यभक्त वृंदवरद भूयोभूयो नमाम्यहं ।। वंद० ।।२।। चित्तजादि वर्गषट्क मत्तवारणांकुशं ।। तत्त्वसार

शोभितात्म दत्त श्रीयावल्लभं उत्तमावतार भूतकर्तु भक्त वत्सलं ।।वंद० ।।३ ।। व्योम आप वायु तेज भूमि कर्तुमीश्वरं ।। काम क्रोध मोहरहित सोम सूर्य लोचनं ।। कामितार्थ दातुभक्त कामधेनु श्रीगुरुं ।। वंद० ।।४ ।। पुंडरीक आयताक्ष कुंडलेंदु तेजसं ।। चंडदुरित खंडनार्थ दंडधारि श्रीगुरुं ।। मंडलीक मौलिमार्तांड भासिताननं ।।वंद० ।।५ ।। वेदशास्त्र स्तुत्यपाद आदिमूर्ती श्रीगुरुं ।। नाद बिंदूकलातीत कल्पपाद सेव्ययं ।। सेव्यभक्त वृंदवरद भूयोभूयो नमोम्यहं ।। वंद० ।।६ ।। अष्टयोग तत्वनिष्ठ तुष्टज्ञान वारिधिं ।। कृष्णावेणींतीर वासपंचनद्यसंगमं कष्टदैन्य दूरभक्ततुष्टकाम्यदायकं ।। वंद० ।।७ ।। नरसिंह सरस्वतीशनामअष्टमौक्तिं । हारकृत्य शारदेन गंगाधराख्या स्यात्मजं । कारुणीक देवदीक्ष गुरुमूर्ति तोषितं ।। परमा त्मानंदश्रियापुत्रपौत्रदायकं ।।वंद० ।।८ ।। नारसिंहसरस्वतीश अष्टकं च यः पठेत ।। घोरसंसार सिंधु तारणाख्यसाधनं ।। सारज्ञानदीर्घमायुरारोग्यदि संपदम् ।। चारुवर्गकाम्यलाभ वारंवार यः पठेतू ।। वंद० ।।९ ।।

धांवा-१

(राग-सारंग चाल - जो जो रे)

गुरुराया, नरहरि दत्तात्रेया । येई येई बा । करुणासागर पुरुषोत्तमा । सद्भक्त कल्पद्रुमा । अठरा पुराणें । तव महिमा। न कळे निगमागमा । पतितपावना करुणालया । नरहरि दत्तात्रेया । येई येई बा ।।१ ।। तापत्रयाने तापविले । देह माझे कष्टविले । कोठे विश्रांती नाढळे । चरण तुझे सांपडले। आतां कृपेची करि छाया । नरहरि० ।।२ ।। कामक्रोधादि अहंकार ।

उठती वारंवार । अंगी मातेला अविचार । पडला अंध:कार । स्त्रिया -पुत्रांची बहु माया ।।नर० ।।३ ।। वर्णू तव कीर्ती । लवलाही । रजकाला पाछाई । दिधली क्षणांत बा । तूं काई। तूंचि बाप माई । अघटित घटना तुझी । बा सखया । स्वामी दत्तात्रेया । येई येई बा ।। नर०४ ।। नवस करुनि तुला । निघाला। धनिक उदिमा गेला । लाभ चौगुणी। त्या झाला । चोरांनी मारियला । तस्कर वधुनियां । उठविसी । तया ।।नर० ।।५ ।। अन्न भक्षितां उठे शूळ । विप्र करी तळमळ । प्राण त्यजितां तात्काळ ।आणविसी आपणाजवळ । अन्नचि औषध देशि । तया भक्षाया ।। नर० ।।६ ।। करवीर क्षेत्रींचा द्विजपुत्र। विद्येविण अपवित्र । जिव्हा छेदुनियां अहोरात्र । करि भुवनेश्वरी स्तोत्र । देशी चौदाही । विद्या तया ।। नर०।।७।। अन्नपूर्णा तुज कर जोडी। पक्वान्ने बहु वाढी । घेवड्या शेंगाची तुज गोडी । सखा (भला) दिनाचा गडी । देशी घागर भरून। पुतळ्या तया ।। नर० ।।८ ।। शिरोळग्रामींची द्विज नारी । पुत्रा संबंध मारी। ठेवी कलेवरा औदुंबरी । म्हणे पाव नरहरी । उठविसी तात्काळ। पुत्र तया ।। नर०।।९ ।। वांझ महिषीचे दूध पीसी । विप्र-स्त्री सुखविसी । पतितामुखीं वेद बोलविसी । द्विजगर्वा छेदिसी । न कळे कवणाला । तव चर्या ।। नर० ।।१० ।।त्रिविक्रम भारती करि निंदा । म्हणे हा दांभिक धंदा । विश्वरूप तया मुकुंदा । दाखविसी गोविंदा । नरसिंह सरस्वती । गुरुराया ।। नर० ।।११ ।। माहूरपुरीचा रोगी पती। घेऊनि निघाली सती । मार्गी मरण आले तयाप्रती । बहु करि काकुळतीं । देसी अभय तया । सौभाग्या ।। नर० ।।१२ ।।

सत्कर्माचरणी बहुश्रुत । नेमें वरिलें चित्त । परान्न भक्षाया उद्युक्त । स्त्री बहु तळमळत ।आज्ञा देऊनिया दंपत्या। विपरित देखे जाया । आली बा भेटाया । तव पाया ।। नर० ।।१३ ।। तीन पात्रांची सामुग्री ब्राह्मण भिक्षा करी । छाटी झांकुनिया अन्नावरी । जेविले सहस्र चारी । कीर्ती झाली बा । जगत्रया ।।नर०।।१४ ।। साठ वर्षांची म्हातारी। वंध्या पदर पसरी । करुणा येऊं तुज हरी । देशी पुत्र कुमारी। समर्थ दुःखचि तूं । हराया ।।नर० ।।१५ ।। श्वेत कुष्टाने व्यापीला । ब्राह्मण धांवत आला। रक्षी रक्षी म्हणे दयाळा। शुष्क काष्ठ द्रुम केला । निर्मळ झाली बा । तात्काळा ।।नर०।।१६ ।। सायंदेव पंत निज भक्त । तव भजनी आसक्त । दिधले तयासी बा निजतत्वा । ऐशा कथा अनंत । शेषादिक थकले । गुणगाथा ।।नर० ।।१७।। तंतुक भक्त तुझा करि सेवा । म्हणे पाव गा देवा । दर्शन श्रीशैल्या महादेवा । करविसी केशवा । माता पिता तूं । गुरुराया ।।नर० ।।१८ ।। देवा दिपावळीचे दिवशीं । अष्टरूप झालासी। भिक्षा आठ गृही तूं घेसी । दीनबंधु म्हणविसी। करिसी भक्ताशी। बहुं माया ।।नर० ।।१९ ।। गाणग्रामीचा कुलवादी । मार्गी उभा कर जोडी । आडवा पुढेपडे घडोघडी । पीक हजारो खंडी। देशी शुद्राला । स्वामीया ।। नर० ।।२० ।। केवळ मतिमंद पातकीं। बहु जन्मीचा दुःखी । महादेवात्मज करा सुख । कृपादृष्टी अवलोकी । ठेवा हात शिरी । करा तया ।।२१ ।।

धावा २

येई बा गुरुराया । मज घें पदरी । लोटे ना भवसिंधू ।

बळिया लहरी ।। येई ।।धृ० ।। मायेचा पूर लोटे मज वाहविती। काळाचे भय वाटे । तुज आठविती । युगसम बहुकष्टी बा । दिन घालविती । तुजसाठी उर दाटे । जीव आळविती ।।येई ।।१ ।। कोठे नगमे देवा । हरि काय करूं। कोणा तें दुःख सांगू । गुरु कल्पतरू । आतां तुजविण दत्ता । किती धीर धरूं। भेटाया गुणराशी । तपकाय करूं ।। येई ।।२।। कोण दुजा प्रणिताबा। प्रतिपाळ करी । तुज विरहित मज नाही । गति बा दुसरी । बुडतों या भवडोही । करी कोण धरी । देवा श्रम झाले बा । मम दुःख हरी ।। येई ।।३ ।। योगीजनमन रमणा । जननी जनिता। देवा बहुदिन झाले । मज चाळविता । कैसे मज दुःख झाले । शिरी तूं असतां । स्वामीं तूं गुरु माझा । भव उद्धरिता ।। येई ।।४ ।। प्राण विसावा माझा । हरि तूं अससी । सागर तूं करुणेचा । मज कां छळसी । सुर-,नर-मुनी सकळांच्या हृदयी वससी । सेवक मी हरी तुझा । दुरी कां धरिसी ।। येई ।। तव विरहे मम नयनी । जळ पाझरते । लवपळ आयुष्य माझे । हरि हे सरते । साधन काय करूं मी मननापरते । जीवलग तूं कधी येसी । मन घाबरते । येई ।।६ ।। यत्नांची हद्द झाली । मतीही भ्रमली । नाही धीर दयाळा वृत्ती डळमळली । तव पद सेवा कांही मज नाही घडली । निरपेक्षा हरि माझी भुली कां पडली ।। येई ।।७ ।। कैसा तरी गुरुवर्या तव दास असे । सम्यक सगुणरूप तुझें नयनी विलसे । नारायणात्मज विनवी पथ पाहतसे । स्वामी निरंजन दत्ता पदी लागतसे ।। येई ।।७ ।।

प्रार्थना

ज्या ज्या स्थळी हें मन जाय माझे ।। त्या त्या स्थळी हे

निजरूप तुझे ।। मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ।। तेथें तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही ।।१ ।।

विडा- १

(एकादशीस विडा नाही)

विडा घ्या हो नरहरि राया। धरूनी मानवाची काया । यतिवेष घेऊनियां । वससी दीनासि ताराया ।। विडा० ।। ज्ञान हे पूंगीफळ । भक्ति नागवल्लीदळ । वैराग्य चूर्ण विमळ लवंगा सत्तक्रिया सकळ ।। वि० ।।१ ।। प्रेमरंगी जैसा कात। वेळा अष्टभावसहित । जायफळ क्रोधरहित । पत्री सर्व भूतहित ।। वि० ।।२ ।। खोबरे हेचि क्षेम । फोडोनि द्वैताच्या बदामा । मनोजाचा वर्ख हेमा । कापूर ही शांतिनामा ।। वि० ।।३ ।। कस्तुरी निरहंकार । कोठे न मिळे उपचार । भीमापुत्र यास्तव फार । खाद्य देऊनि वारंवार ।।वि० ।।

विडा- २

विडा घ्याहो सद्‌गुरुनाथा । श्रीपदि ठेऊनिया माथा । प्रार्थिती भंक्तजन स्वामी त्रिमूर्ती समर्था ।।धृ० ।। देवा षड्रस पक्वाने । नाना भक्तप्रिय परमान्ने । भोजन केले श्रीगुरुराये प्राशुनिं जीवन परिपूर्ण ।।१ ।। नागवेलीची पक्वपूर्णे । चिकणीं सुपारी, सुचूर्ण । काचगोळचा दालचिनी । वर्ख रौप्य हेमाते पूर्ण ।।२ ।। जायपत्री, जायफळ, वेला , कर्पुर, शीतळ । खोबरें , केशर, लवंगा । त्रयोदशगुणी तांबूल ।।३ ।। केली सिंहासनी शेज । पहुडावया श्रीगुरुराज । भक्ती पुष्पे सप्रेम परिमळ । दीप अष्टभाव सुतेज ।।४ ।। स्वामी अति निद्रेते त्यागावे । भक्तस्मरणासी पावावे । चरणसेवा हो अखंडित ।

इतुके गुरुभक्तासी द्यावें ।।५ ।।

(नंतर वैदिकांचे म्हणणें होऊन शेजारची होते)

शेजारती १ ली

आतां स्वामी सुखे निद्रा करा अवधूता । नरसिंह सरस्वती अवधूता । चिन्मयसुखधामी जाऊन पहुडा एकांता ।।धृ०।। वैराग्याचा कुंचा घेऊनि चौक झाडीला । गुरु हा चौक झाडीला । तयावरतीं सप्रेमाचा शिडकावा केला ।।१।। पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ति । सुंदर नवविध भक्ति । ज्ञानाच्या समया उजळुनि लाविल्या ज्योती ।।२ ।। भावार्थाचा मंचक हृदयाकाशी टांगिला । हृदयाकाशी टांगिला । मनाची सुमने करुनी केले शेजेला ।।३ ।। द्वैताचें कपाट लोटुनि एकत्र केले । गुरु हे एकत्र केले । दुर्बुद्धीच्या गांठी सोडुनि पडदे सोडियले ।।४ ।। आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनि गलबला । गुरु हा सांडुनि गलबला । दया क्षमा शांति दासी उभ्या शेजेला ।।५ ।। अलक्ष्य उन्मनीं घेऊनी स्वामी नाजूक शेला । गुरु हा नाजूक शेला । निरंजन सद्‌गुरु स्वामी निजे शेजेला ।।६ ।।

शेजारती २ री

सुखे पहुडा आता श्रीगुरुनाथा । स्वामी सद्‌गुरुनाथा । निज सुखधामी प्रेमी पहुडे समर्था ।।धृ० ।। चतुर्विध पुरुषार्थाचा मंचक शोभतो सुरत्नखचित । मायासूत्री विणला विश्वसूत्री विणला । सर्वांतरगंत संभूत ।।१ ।। अशा तृष्णा कल्पनेच्या करोनियां वाती । प्रेमे भिजवुनिया वाती । पंचभूती समया । पंचतत्वी समया लाविल्या ज्योती ।।२ ।। मृदुशय्या

प्रिय केली सुमनांची शेज, पुष्पांची शेज । पहुडावया गुरुवर, पहुडावया प्रभुवर, श्रीसद्‌गुरुराज ।।३।। दया क्षमा शांति भक्ति अर्पुनि परिमळ । भक्ति अर्पुनी परिमळ भावार्थे उदबत्त्या, परमार्थे उदबत्या लाविल्या सकळ ।।४।। चामर ढाळिती सिद्धी अष्ट नवभक्ति । नवविध चत्वारी मुक्ति । ज्ञानामृत सद्‌बोधे परमामृतसद्‌बोधे श्रुतीशास्त्रे स्तविती ।।५।। द्वैतकपाटे दिधली सुखप्रेमानंदे निजसुखस्वानंदे । गांठी उदबोधाची गांठी चिदबोधाची सोडियले पडदे ।।६।। अलक्ष उन्मनी भूषण सत्त्व प्रावर्ण, अंबर प्रावर्ण । जीवन देऊनि चूरि जो, तांबुल देऊनि चूरि जो, गुरु भक्त चरण ।।७।।

शेजारती ३ री

आतां स्वामी सुखे निद्रा करा गोपाळा ।। स्वामी दत्त दयाळा ।। पुरलें मनोरथ जातो आपुल्या स्थळा ।। आतां०।।१।। पावला प्रसाद आतां सुखें निजावें ।।आतां सुखें पहुडावे । आपुल्याला श्रम होती बहुत स्वभावे ।। आतां० ।।२।। तुम्हांसी जागविले स्वामी आपुल्या काजा ।। स्वामी आपुल्या काजा । शुभाशुभ कर्म दोष हरावया पीडा ।। आतां ० ।।३।। तुका म्हणे दिधले उच्छिष्टाचें भोजन । स्वामी स्वानंदाचे भोजन । नाही निवडीले एक एक भिन्न ।। आता० ।।४।।

शेजारती ४ थी

नृसिंहसरस्वती । मनिं धरूनियां प्रीति । ओंवाळीतों शेजारति । अंगीकारा यतिपति ।।नृ० ।।धृ०।। ब्रह्मा येउनि देवदेवा । म्हणे कवण्या कवण्या जीवा । उपजवुं कोठे केव्हां। संदेश हा मज व्हावा ।।नृ०।।१।। विष्णुही येऊनीयां। आज्ञा मागे

वंदूनियां । कवण्या जीवा काय खाया । कैसें देऊं कवण्या ठाया ॥नृ० ॥२॥ येऊनीयां महादेवा । वंदूनीया पादद्वंद्वा । ज्ञान देऊं कवऱ्या जीवा । आज्ञा करा स्वयंमेवा ॥नृ० ॥३॥ अंबा म्हणे बाळा यति । फार झाली असे रात्री । झोंप आली तूजप्रति । भक्त रक्षुनि श्रम होती ॥नृ० ॥४॥ विनवीताती भक्तवृन्द । सेवा घेऊनीया छंद । पूर्ण देई ब्रह्मानंद । भीमपौत्रनंदकंद ॥नृ० ॥५॥

अपराध क्षमापन स्तोत्र

अपराध क्षमा आतां केला पाहिज़े ॥ गुरु हा केला पाहिजे । आबद्ध सुबद्ध गुण वर्णियले तुझे ॥धृ० ॥ न कळेची टाळ वीणा वाजला कैसा ॥ गुरु हा वाजला कैसा। अस्ताव्यस्त पडे नाद गेला भलतैसा ॥१॥ नाही ताल ज्ञान नाहीं कंठ सुस्वर ॥ गुरु हा कंठ सुस्वर ॥ झाला नाही बरा वाचे वर्ण उच्चार ॥ अ० ॥२॥ निरंजन म्हणे देवा वेडे वांकुडे। गुरु हे वेडे वांकुडे ॥ गुण दोष न लावावा सेवका कडें ॥३॥

प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्याने पाहिन रूप तुझे । प्रेमें आलिंगन आनंदे पूजिन ॥ भावें ओवाळिन म्हणे नामा ॥१॥ त्वमेव माता च पिता त्वमेव ॥ त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥ त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ॥ त्वमेव सर्वं ममदेव देव ॥२॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ॥ करोमि यद्यत् सकलं परस्मै नारायणेति समर्पयेत्त ॥३॥ लोकाभिरामं रणरंगधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम् । कारुण्यरूपं करुणाकरंतम् श्रीरामचंद्रम् शरणं

प्रपद्ये ॥४॥ अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णं दामोदरं वासुदेवं भजे । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥५॥ हरिनारायण दुरिता निवारण परमानंद सदाशिव शंकर । भक्तजनप्रिय पंकज लोचन नारायण तव दासोऽहम् ॥६॥ नमो गुरुभ्यो गुरु पादुकेभ्यो नमः परेभ्यः परपादुकाभ्यः । आचार्य सिद्धेश्वर पादुकाभ्यो नमोस्तु लक्ष्मी पति पादुकाभ्यः ॥७॥आनंदमानंद कर प्रसन्न ज्ञानस्वरूप निजबोधरूपम् ।योगीद्रमीड्यं भवरोगवैद्यं श्रीमद्गुरुं नित्य महन्नमामी ॥८॥ दत्त दत्त जय दत्त दत्त जय ॥

तुकाराम कृत अभंग

तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत ॥१॥ काखे झोळी पुढे श्वान । नित्य जान्हवीचे स्नान ॥२॥ माथां शोभे जटाभार अंगी विभूति सुंदर ॥३॥ शंख चक्र गदा हाती । पायी खडावा गर्जति ॥४॥ तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥५॥

दत्तमंदिराचे द्वार बंद होते व भक्तजन आपापल्या घरी जातात .

पालखीचे वेळी म्हणायचे इतर पदे

पद १ ले (राग - कालगंडा, ताल धुमाळी)

आतां मी नाही । मी नाही । नरहरिवांचुनि कांही आतां मी ॥धृ०॥ विकल्प अवघा सरला । दोही डोळा नरहरि भरला ॥ आतां ॥ अनुभव पाऊलि वाटे । जिविचें जीवन नरहरि भेटे ॥ आतां ॥२॥ सच्चित्सुखघनसारा ॥ नरहरिविरहित व्यर्थ पसारा ॥ आतां ॥३॥ सांडुनि साधन क्षुद्रा सबाह्य अंतर

नरहरि मुद्रा ॥ आतां० ॥४॥ शिवदिन जिवपण नेलें । केलेसरि गुरुने नरहरि केलें ॥ आतां० ॥५॥

पद २ रे (राग- कालंगडा, ताल-धुमाळी)

इतुके दे मजला दे मजला । मागतसें हरि तुजला । इतुकें ॥धृ०॥ संतसमागम अर्चा । सारासार ज्ञानचर्चा ॥ इतुकें ॥१॥ संत घराप्रति येती । भक्तिभावें शरण तयाप्रति ॥ इतुकें ॥२॥ भगवद्भजनीं जागे । तुझिया स्वरूपी मन हें लागे ॥ इतुकें ॥३॥ ऐसेचि वैभव देऊ । अखंड केशव सद्गुरुपायी ॥ इतुकें ॥४॥

पद ३ रे

गुरुपद कमळी मनभ्रमरा । धरिशिला जरी तूं दृढ गाथा॥ तरि तुज निजसुख मधु चारा । भावे (लाभे) न मिळे जो अमरा ॥ गुरु० ॥धृ०॥ मंजुळ सद्गुण गान करी । निजरूपी निश्चळ प्रेम धरी । नित्य निरंजन गुरु नरहरी । सर्व चराचर मति विवरी ॥ गुरु ॥१॥ प्रपंच चंपकसुमन असे । तेथे क्षणभरी तूं न वसे । अद्वयभजनी भ्रम निरसे । श्रीधर विभु मग नयनीं दिसे ॥ गुरु० ॥०॥

पद ४ थे

दत्ता ब्रह्मचारी ब्रह्मचारी । त्रिभुवनांत तुझी फेरी ॥धृ०॥ सह्याद्री आसन । माहूरपुरि निद्रास्थान ॥दत्ता० ॥१॥ काशीत स्नान करी । चंदन लावी पंढरपूरी ॥ दत्ता० ॥२॥ कोल्हापूरी फिरे झोळी । भोजन करीं पुरी पांचाळी ॥दत्ता० ॥३॥ तुळजा पुरी धुवी हस्त ॥ मेरूशिखरीं समाधिस्त ॥ दत्ता० ॥४॥ माणिक सद्गुरुनाथ जगद्व्यापक हा अत्रिसुत ॥दत्ता० ॥५॥

पद ५ वे

त्रैलोक्याचा राजा नरहरि तो माझा तो माझा ।।धृ० ।। नांदे अमरापूर ग्रामीं । कृष्णातीरीं यतिवरस्वामी ।। सद्गुरु तो० ।।१ ।। नृसिंहसरस्वती करुणामूर्ति । त्रिभुवनि गाती ज्याची कीर्ती । सद्गुरु तो० ।।२।। श्रीधरविभू निजकैवारी । भावे भजता भवभय वारी । सद्गुरु तो० ।।३ ।।

पद ६ वे

स्वामी तारि रे जगदीशा । स्वामी तारि बा जगदीशा । जयजय पुराण पुरुषा ।।धृ० ।। दुष्ट पापिष्ठ मी वरिष्ठ । भोगितसे बहु कष्ट ।। स्वामी ।।१ ।। नाना योनी मी बहु फिरलो । नाहीं तुजला स्मरलो ।। स्वामी ।।२ ।। हीन दीन करि पूर्ण । आलो तुजला शरण ।। स्वामी ।।३ ।। सर्वहि करी क्षमा अपराध सत्त्वर करीं बा बोध ।। स्वामी ।।४ ।। वाहे गुरुभक्त सान्निध रक्षक ब्रीद प्रसिद्ध ।। स्वामी ।।५ ।।

पद ७ वे

सद्गुरुजी कोठवरी वाट तुझी पाहूं । नरहरिजी कोठवरी वाट तुझी पाहूं । जिवलगा केवि तुझा वियोग मी सांडू ।।धृ० ।। पतित म्हणुनि काय मला न भेटशी देवा । पतितपावन नाम काय वागविशी देवा ।। स० ।।१ ।। व्यापक तूं जनी वनी आळविसी मातें । ऐक्यपदी जिवाशिवा नसे भेदनातें ।।स० ।।२ ।। सैंधवाचा खडा पडे जरी सागरांत अल्प म्हणूनि त्यागितसे काय जलधि त्यातें ।।स० ।।३ ।। श्रीनृसिंहसरस्वती जगद्गुरुराया । श्रीधर विभू पाव आतां नमन तुझ्या पायां ।। सा० ।।४ ।।

पद ८ वे

शरण जाई तूं श्रीगुरुपदी । दत्ता मग कृपा करील तारिल सद्‌गुरुनिधी ।।धृ०।। अत्रिपत्नीचे सत्त्व पहावया । जातां त्रैमूर्ती जाहले बाळ । त्रिगुणात्मक हा दत्त तधी ।।श०।।१।। पिठापूरि ते अवतरे गुरु । भक्त सदा स्मरणें तारी । श्रीपाद तरुवर स्मर आधी ।।श०।।२।। अंबिकेकुशा जन्म घेऊनी । लीला केलि चरित्र वरद । पठतां करि सर्वसिद्धी ।।श०।।३।। तस्करे द्विजा वधुनि हरि धना । धांवुनि प्रभू द्विज जिववुनी । त्वरें निशाचार वधी ।।श०।।४।। पाहुनि सिद्ध भू वरदि संगमीं। कल्पद्रुमी वसति स्वामी । गुरुभक्ताचा निधी ।।श०।।५।।

पद ९ वे

गुरु त्रयमूर्ती अवतारी । भक्तवांच्छित पूर्ण करी ।।धृ०।। त्रिविक्रम यतिसी द्विजवर छळितां । अंत्यजामुखी गर्व परिहरी ।। गुरु० ।।१।। दीनदासाची वांच्छा जाणुनि । धरवी छत्र रजक शिरी ।। गुरु० ।।२।। भ्रतार सतीचा जिववुनि स्वामी । सौभाग्य दिधलें ध्रवासरा ।। गुरु० ।।३।। गोत्र भारद्वाज द्विजपूजका वर दे । 'वंशतरू सफल साह्य मी करो' ।।गुरु० ।।४।। श्रीगुरुभक्त प्रभुसी प्रार्थी । रक्षि ब्रीद सद्‌गुरु निरंतरी ।। गुरु० ।।५।।

पद १० वे

त्रिजगीचा श्रीमंत । गुरु सभाग्यवंत ।। करी जो सुरा नराला । त्रिजगीचा श्रीमंत ।।धृ०।। विश्वसृष्टिमाजीं विश्व निर्मिता । पालक श्री भगवंत । सर्वदा पालक श्री भगवंत ।। गुरुस भाग्यवंत ।।१।। दैन्य दानव मर्दूनी सर्वहि । सुरपदि स्थापि यशवंत प्रभू जो सुरपदि स्थापि यशवंत । गुरुस० ।।२।।

विश्वनाटकी विंभू विश्वपालक । सकलकला गुणवंत । जाणे जो सकलकला गुणवंत गुरुस० ॥३॥ युगायुगी करिं जगिं संभव जो । तारक भक्त सतत आद्यंत । संकट तारक भक्त सतत आद्यंत ॥गुरुस० ॥४॥ भक्तकामकल्पद्रुम जो विभू गुरुभक्ता प्रिया पुरवि अनंत । स्वामी हा गुरुभक्ता प्रिय पुरवी अनंत ॥गुरुस० ॥५॥

पद ११ वे

यतिवर कृष्णातीरी । राहिला गुरुवर कृष्णातीरी । कीर्ती करी क्षितिवरी । राहिला यतिवर ॥कृ० ॥धृ० ॥ काषायांबर भस्म विराजे । दंडकमंडलु करीं ॥ राहिला० ॥१॥ द्विजाश्रमी अमरापुरी जाऊनि । दैन्या तया परिहरी ॥ राहिला० ॥२॥ पवनगती तंतुकासी नेऊनि । घेई पूजा गिरिवरीं ॥ राहिला० ॥३॥ शिरोळ ग्रामिचा द्विजसुत जिववुनि । अघटित घटना करी ॥ राहिला० ॥४॥ कैवारी जो गुरुभक्ताचा । दीन जना उद्धरी ॥ राहिला० ॥५॥

पद १२ वे

जाऊ शरण चला । सुंदर सद्गुरु पदकमला ॥ धृ० ॥ काममदादीक पुष्टषड्रिपू । नेतील नरकाला ॥ कालदुत मग शासतील । तुज स्मरूनी कर्माला ॥१॥ मारीती तोडिती भेटविती । जे सुतप्त शूलाला ॥ तेव्हां बापा पावशील तू पश्चातापाला ॥२॥ सावधान होवो नाही ग्रासिले काळे देहाला ॥ दिनदास शशीकंठ प्रभूच्या । चरणी लीन ॥३॥

पद १३ वे

प्रभू का नये तुला मम करुणा । शरण मी तुझ्या चरणा

॥धृ०॥ काय पातकी मीच जगांतरी म्हणुनि उपेक्षिसी अघहरणा ॥१॥ केव्हां तरुनी बहु भक्तासी भागलांत का श्रीरमण ॥२॥ केव्हां स्थलनच वैकुंठ तरि द्या शीतकंठा नीज चरणा ॥३॥

पद १४ वे

गुरुचे पाय मनीं ध्याऊं ॥ श्रीचें पाय मनीं ध्याऊं ॥धृ०॥ पाय न येती जरि मनीं ध्याता ॥ नामाचि आम्ही गाऊं ॥गु०॥१॥ नामहि नये सर्व काळ मुखी ॥ पूजाकाळी पाहू ॥गु०॥२॥ तेहि घडेना प्रतिदिनी जरि तरि । वाडीमध्ये त्या राहु ॥गु०॥३॥ वाडीमध्ये त्या संसाराची ॥ काळजी आम्ही नच ठेवूं ॥गु०॥४॥ लक्ष्मण म्हणे मी कुसुम पदद्धये ॥ पाहिली आण पुढे वाहूं ॥गु०॥५॥

पद १५ वे

दत्ता हा स्तवन हार अर्पितो तुला ॥ अनुभवसह प्रेमभरे आजि गुंफिला । त्रिभुवनी तू थोर म्हणुनि श्रुतीने गाईले।।गातां गातां नेति म्हणुनि शास्त्र भागलें ॥ जिकडे तिकडे दत्तस्वरूप सहज संचरलें ॥ चाल ॥ दत्ता, त्राता, शास्ता भवहरिता, सुख करिता चित्सविता, भेट दे मला ॥ दत्ता० ॥१॥ निर्गुण तू सगुण होसी भवतारका । दैन्य दुःख हरूनीं जना सौख्यकारका ॥ चाल ॥ सदया पाया, ध्याता, दे शक्ति निजभक्ती, मनःशांती भक्तवत्सला ॥दत्ता०॥२॥ सर्वव्यापी कोठे पाहूं ठाव ना मला ॥ परात्पर स्तुति केली गाऊं तुजला ॥ चेतोपर रूप ध्यान भाव नुरला ॥चाल॥ अमना, नमना, शमना, चिद्भुवना, भव दमना, गुरु कवना, दत्त शोभला ॥ दत्ता०॥३॥

पद १६ वे

भाव धरा रे ।। आपुलासा दत्त करा रे ।। धृ० ।। कोणी काय म्हणे या साठी ।। बळकट प्रेम असावे गाठी ।। निंदा स्तुतिवर लावुनि काठी ।। मी तू हरा रे ।।आ० ।।१ ।। सकाम साधन सर्वही सोडा ।। निष्कामें मूळ भजनी जोडा ।। नाना कुर्तक वृत्तिशी दवडा ।। आली जरा रे ।।२ ।। मानव देही साधन भक्ति ।। यासाठीं याची उत्पत्ती ।। ऐसा विवेक आणुनि चित्तीं ।। प्रभूसी वरा रे ।।आ० ।।३ ।। सकळहि अर्पी गुरुचे ठायी जगी तयाविण न दिसे कांही ।। एकचि निश्चय दुसरा नाहीं ।। भाव धरा रे ।।आ० ।।४ ।।

पद १७ वे

नरहरि गुरुमहाराज । सर्वेश्वर गुरुराज । दयाळा कृपावलोकी ।।नर ।।धृ० ।। नाना योनी मी बहु फिरलो । नाही स्मरलों प्रभुराज । सर्वेश्वर गुरुराज ।।१ ।। साधु संत जन सर्व निंदिले न वंदिले सुरराज । कदापी न वंदिले सुरराज । सर्वेश्वर गुरुराज ।।२ ।। मज दुष्टाते कां करि धरिलें। सोडिता जाईल की लाज या ब्रिदाची, सोडितां जाईल की लाज । सर्वेश्वर गुरुराज ।।३ ।। पुरोहित केला मम पूर्वज जो । जाणुनि स्वहित भक्तकाज । अंतरी जाणुनि स्वहित भक्तकाज । सर्वश्वर गुरुराज ।।४ ।। म्हणे गुरुभक्त अभक्त केले करि मजशी भक्तराज । त्रिलोकी, करि मजसी भक्तराज । सर्वेश्वर गुरुराज ।।५ ।।

पद १८ वे

श्रीगुरुवर वंदिला । स्वामी जो, श्रीगुरुवर वंदिला । वंदिला स्वामी, वंदिला स्वामी । वंदिला स्वामी जो श्रीगुरुवर

वंदिला ॥धृ० ॥ ऋषी मुनिजन स्तववुनि ध्याती। तो हा कृष्णासंगमी जो श्रीगुरु० ॥१ ॥ सगुण निर्गुण परमात्मक हा। वर्णियला प्रभू निगमी जो ॥ श्रीगुरु० ॥२ ॥ विश्वजीवनाचा हाची सुत्रधारी । वसे सर्वांतरयामि जो ॥ श्रीगुरु ॥३ ॥ अनंतब्रह्मांडे ज्याचे रोमरंध्री । राहे कल्पद्रुमी जो ॥ श्रीगुरु० ॥४ ॥ दीन गुरुभक्त पृष्ठिशी रिघत । विघ्ने हरीं स्मर्तूंगामी जो ॥ श्रीगुरु० ॥५ ॥

पद १९ वे

श्रीटेंबेस्वामी विरचित दत्ताचा कृपाहस्त मिळविण्याचे स्तोत्र

तापत्रयाने मम देह तापला । विश्रांति कोणी नच देतसे मला। दैव तुझें हें पद लाघले मला । दत्ता कृपासाऊलि दे नमू तुला ॥१ ॥ कामादि षड्वैरि सदैव पीडिती । दुर्वासना अंग सदैव ताडिती मला। त्राता दुजा कोणी न भेटला । दत्ता कृपासाऊलि दे नमूं तुला ॥२ ॥ देही अहंत जडली न मोडावें ॥ गृहदीकस्त्रीममता ना सोडावे । त्रितापदावानळ पोळितो कृपासाऊलि दे नमू तुला ॥३ ॥ अंगी उठे हा अविचार दुर्धरे। तो अमुचें हे बुडवीतेस घर । पापें करोनि जळतो त्वरे मला । दत्ता कृपासाऊलि दे नमू तुला ॥४ ॥ तूंची कृपासागर मायबाप तूं । तूं विश्वहेतू हरि पाप ताप तूं। न तुज वांचुनि दयाळू पाहिला। दत्ता कृपासाऊलि दे नमूं तुला ॥५ ॥ दारिद्र्यदावे द्विज पोळतां तया । श्री द्यावया तोडिशी वेल चिन्मया । तयापरि पाहि दयार्द तूं मला । दत्ता कृपासाऊलि दे नमूं तुला ॥६ ॥ प्रेतासि तूं वाचविसी दयाघन । काष्ठासि तूं पल्लव

आणिशी मना । हें आठवी मी तरि जीव कोमला । दत्ता कृपासाऊलि दे नमूं तुला ।।७।। ह्या अष्टके जे स्तविती तयांवरी । कृपा करीं हात धरी तयां शिरी । साष्टांग घालूं प्राणीपात बा तुला । दत्ता कृपासाऊलि दे नमूं तुला ।।८।।

पद २० वे (चाल - शांत हो श्रीगुरुदत्त)

मच्चिता चिंती सांची । तूं वाडी नरसोबाची ।।धृ०।। वेणीसह कृष्णा जेथे । दक्षिणभागा अष्ट सुतीर्थे । तारक ती असती जेथे । पंचनदी संगम तेथे । कल्पद्रुम आहे जेथे। प्रसाद प्राङ्.मुख तेथे ।। चाल ।। त्यामध्ये सोज्वळ ज्योति। यत्तेजे भासति ज्योति । ज्योतिर्मय तो हो ज्याची । दृक् पाहे पद हें साची ।।म०।।१।। पुरुषार्थ राहती चार । स्तंभरूपी तेथे समोर। उत्तरेस विघ्नेश्वर दक्षिणेस आसन रुचिर । प्राङ्.मुख ते वामनद्वार । लखलखीत धातुविकार ।। चाल ।। त्यामध्ये हरिपदे आहे । त्याला जो प्रेमें पाहे । भवभारा नच तो वाहे । मोहे नच जगि मति त्याची ।।म०।।२।। जे प्रात:काळी पहाती। पादुका अभिषेकाती। जे महापुजा करिती । अभिषेक स्नपना करिती ।।चाल।। गुरुचरित्र ऐकति पठती । आश्रिता भोजन देती । जो वस्त्रालंकृति देती । पालखी मिरविती गातीं । सर्व ही ते संसृति तरती । भुक्ति मुक्ति दासी त्यांची ।।म०।।३।। पुजारी चारि फडांचे । सहकुटुंब पाळी वाचे । पाळुनिया बिरुद तयांचे । वाहे योगक्षेमतयांचे । करुणाकर नरहरी त्याचे । गुण गाई मधुर सुवाचे। चाल । जो औदुंबरतळवासी ।अन्न पूर्णा योगिनी ज्यासी। सेविती जान्हवी तैसी । आचरिता सेवा ज्याची । गति होते ब्रम्ही त्यांची ।।म०।।४।।

पद २२ वे (चाल - मला शान मुनि० ताल- झंपा)

नरा दत्तगुरु हे परब्रह्म आहे । होई जागृत उगा फससि मोहें ।।धृ० ।। दत्तगुरु मन्मनी दत्तगुरु लोचनी । दत्तगुरु मद्वचनि भरुनि कानीं । दत्तगुरु बाहरी । दत्तगुरु अंतरी । दत्त सर्वांतरी भरुनि राहे ।।१ ।। ब्रह्मा हा दत्तगुरु विष्णु हा दत्तगुरु ।। रुद्र हा दत्तगुरु सत्य आहे ।। दत्तगुरु तारक दत्तगुरु कारक ।। शक्तिधर लोकसाक्षीच आहे ।।२ ।। दत्तगुरुवांचूनि किमपि नाहीं जनी। दत्तगुरु वांचुनि सुरहि नोहे । दत्तगुरु वांचुनि काय फल वांचुनि । जाय फळ सोडुनि भोगितां हें ।।३ ।। माय फळ पांजितें काय फळ होय ते । जाय फळ पुण्य ते भोग नासें । मोहफळ दे त्यजुनि नाहीं फळ याहूनी । म्हणूनि तूं दत्तगुरु पाद पाहे ।।४ ।। भोग खोटा नको योगताठा नको । योगताठा नको धरू विमोहे । दत्तगुरु वांचुनी चित्त न धरी जनीं । दत्तगुरु घे मनी भरुनी स्नेहें ।।५ ।। या युगी साधनें वाऊगीं गुरुविणे ।। ना उगीं तूं शिणे शास्त्रमोहे । दत्तगुरु देव हा दत्तगुरु तारि हा ।। स्वानुभवें वासुदेवचि वंदे हें ।।६ ।।

पद २२ वे

नरसोबाची वाडी जे लोकमान्या । कृष्णातीरा शोभती जे सुधन्या । अन्या तैशी देखिली म्या न साची । श्रीदत्ताची राजधानी सुखाची ।।१ ।। कृष्णा वाहे पूर्व भागीं जियेंच्या। प्रत्यक्तीरीं वास आहे तियेच्या ।। श्रीदत्ताचा कल्पवृक्षतळी तो । त्राता, ज्याच्या चिंतेने मोक्ष होतो ।।२।। जो चिंतितां तत्क्षणिं वारि मोहा।त्यांच्या पदीं सतत ठेवि देहा। मोहां तिका तारि मला परेशा । न तुजवांचोनि शरण्य धीशां ।।३ ।।

पद २३ वे (चाल-भला जन्म हा)

श्रीनृसिंहवाडीचा महिमा आम्ही सांगतो तुला । ऐकुनी घेई गुरुच्या मुला ।।धृ०।। कृष्णावेणी पंचगंगेच्या पुण्यसंगमावरी । सदा ही शोभे पावनपुरी । दत्तराज नरसिंहसरस्वती त्रिमूर्ति विधि हरहरी । विलसती येथे कृष्णातिरीं । कल्पवृक्ष औदुंबर प्रभूवरि शीतल छाया घरी। विराजती गुरुवर निजमंदिर ।।चाल।। पदकमळें ज्यांची घनश्यामसुंदर । निजपदस्वरूपी स्वयेंच ते गुरुवर । सच्चिदानंदघन व्यापक सर्वेश्वर ।। चा.प.।। ह्या नृसिंहयति नरसोबाचा आश्रय आहे हिला । म्हणोनि महिमा जगि जाहला ।।श्रीनृसिंह०१ ।। दीनदयार्णव अंबामाधवनंदन श्रीगुरुयती । कल्पतरु कामधेनु शोभती । भावभक्तिने जे नर त्यांच्या पादुकांसि पूजिती । राहुनी तेथें उपासिति । प्रदक्षिणा घालिती, तयांचे चरित्र ही वाचिती । नवविधा भजने आराधिती ।।चाल।। कामना तयांच्या असतील ज्या ज्या मनीं। त्या सकळ पुरविती श्रीगुरु चिंतामणी । प्रभुकृपे लाभती सुत वंध्येलागुनी ।।चा.प.।। दारिद्र्यासि धन, आरोग्य मिळे रोग असे त्याजला । टळे अपमृत्युहि तो ह्या स्थळा ।।श्रीनृ०२।। कुष्टी अपस्मारि अंध बधिरे हृदयशूळि पांगळे । मंदमती मूक होती चांगले । धर्म, अर्थ, काम, मोक्ष चारी पुरुषार्थचि आगळे । या स्थळी तेहि जाति लाभले । श्रीगुरुपादुकार्चनीं फळ सौख्यसमृद्धी मिळे ।दैन्य अघ तापत्रय मावळे ।। चाल ।। ज्या ठायी षड्गुणाधिपति श्रीवल्लभ । अघटितघटनापटु दत्तगुरु स्वयंप्रभु । कवणास काय कधिं तेथे

असे दुर्लभ ।।चा.पा.।। दीनसहोदर स्वभक्तवत्सल देव जगीं गाजाला। तो जिथे शंकरासि लाधला ।।श्रीनृसिंहवाडीचा।।३ ।।

पद २४ वे

त्रैमूर्ती गुरु पादुका । नौका, सुरजनमुनि तारका । त्रिभुवनि रक्षक निका । नौका त्रैमू० ।।धृ० ।। सद्गुरु मूर्ति अनंत कीर्ती । अघटित करि कौतुका ।। नौका, त्रैमूर्ति० ।।१ ।। चिन्मय खाणी निर्गुण सगुणी । दुर्लभ सनकादिकां ।। नौका त्रै०२ ।। पूर्ण ब्रह्म हा प्रभु नारायण । भक्तिप्रिय जो फुका ।। नौका, त्रै०३ ।। जो परात्पर विश्वव्यापक । भवाब्धि परपारका ।। नौका त्रै०४ ।। श्रीगुरुभक्त करुनी मुक्त ।। अक्षय दे पदि सुखा ।। नौका त्रै०५ ।।

पद २५ वे

सद्गुरु परमेश्वर । वंदिला, श्रीगुरु परमेश्वर । भक्त तारि महिवर । वंदिला सद्गुरु परमेश्वर ।।धृ० ।। कृष्णा संगमि त्रैमूर्ति यतिवर । तरुतळिं सर्वेश्वर ।।वंदिला स० ।। यति नारायण भक्त पाहुनी । सायुज्य स्थापि सुरवर ।। वंदिला स०२ ।। सिद्धमुखाने चरित्र नेमी विश्वकाज गुरुवर ।। वंदिला स०३ ।। पूर्ण ब्रह्म हा पुराणपुरुष । परब्रह्म हरिहर ।। वंदिला स०४ ।। आधार स्वामीचा गुरुभक्तासी । सर्वाश्रय जो निरंतर ।। वंदिला स०५ ।।

पद २६ वे

श्रीपाद श्रीवल्लभ न मिजे भावें नरहरी । औदुंबर तरुनिकटी निवसत स्वभक्त कैवारी ।अर्चा करोनि नमिती पदांते गाती परोपरी । सन्निध येउनि अनुदिन विलसति वरि मुक्ती

चारी ।।श्रीपाद० ।।१ ।। श्रीकरकमळीं दंडकमंडलु ब्रह्म विराजित श्री ।। श्रीगणनाथ उमाधव माधव अर्पिति अवघी श्री ।। श्रीकृष्णातट निकट निवासिनी अंकीं ज्याचे श्री ।। श्रीगुरुप्रसाद फल मग देईल सुरपतिची ही श्री।।श्री०२ ।। पदयुग तीर्थे सेवन मात्रें होती निष्पापा ।। पद्मजजनकें गुरुचें नाम स्मरणें अनुतापा ।। पुष्कर आदि करोनी तीर्थे स्नाना आलापा ।। पापत्रय निर्मोचन करुनी पावति अनुकंपा ।।श्री०३ ।। दक्षिणदिङ्.मंडल, परिक्रमुनी आले श्रीपाद ।। दारा नरवर अर्चिति सुमनें दुर्लभ हे पाद ।। दीनदयाघन सद्‌गुरु म्हणवुनि फांकतसे नाद ।। दरिद्रदावानल गुरु सेवुनि झाला आनंद ।।श्री०४ ।। श्रीशांघ्रीच्या भजनें टळली जे अपुली अश्री ।। श्रीकरकंजतळें कुरवाळुनि निजसौजन्य श्री ।। श्रीसंगमसम तीर्थ नसे जे श्रीशैल्याची श्री ।। श्रीगुरुप्रसाद फल मग देईल धनधान्यादि श्री ।।श्री०५ ।। वदनसरोजस्तुति बहु करितां प्रगटे गुरुदेव ।। वंदन करुनी सुरनर तेव्हा अर्पिति निजभाव ।। वाद्यध्वनि बहु तुर्यनिनादें उठला अतिराव ।। वितरागाचा हा वसतीचा जाणावा ठाव ।।श्री०६ ।। लक्ष्मीपतिचा निवास अनुदिनिं भूलोका आला ।। लंकापतिचा समूळ नाश तैंपासुनि जाहला ।। लिंगस्थापन पूजन करुनीं गुरु येथें आला ।। लक्ष्मीपतिपदिं लागुनि जो नर व वचे कळिकाळा ।।श्री-७ ।। भावें भजतां नरहरि गुरुवर काय उणें लाभा ।। भव शौरी अज विनविन मिळवी जहाली अति शोभा ।। भांडारी मग कुबेर घेऊनि रत्नाचा गाभा ।। भूपति समग्र येऊनि अर्चा करिती निजलाभा ।।श्री०८ ।।सप्तार्णवि मनु सप्तार्णांचा भवबंधा

वारी।। 'श्रीपादश्रीवल्लभ' ऐसें वदती सुरनारी ।। गुणगणमंडित निजभक्तांचा झाला सहकारी ।। राजांगणिं मग नाचति हंसें नेईल परपारीं ।।श्री०१ ।।

॥ अथ श्रीचतुःषष्टियोगिनीस्तोत्रं ॥

॥ श्रीस्कंद उवाच ॥

नामधेयानि वक्ष्यामि योगिनीनां घटोद्भव । आकर्ण्य यानि पापानि क्षयंति भविनां क्षणात् ।।१।। १. गजानना २. सिंहमुखी ३. गृध्रास्या ४. काकतुंडिका । ५. उष्ट्रग्रीवा ६. हयग्रीवा ७. वाराही ८. शरभानना ।।२।। ९. उलूकिका १०. शिवारावा ११. मयूरी १२.विकटानना । १३.अष्टवक्रा १४. कोटराक्षी १५. कुब्जा १६. विकटलोचना ।।३।। १७. शुष्कोदरी १८. ललज्जिव्हा १९. श्वदंष्ट्रा २०.वानरानना । २१. ऋक्षाक्षी २२. केकराक्षी च २३. बृहत्तुंडा २४. सुराप्रिया ।।४।। २५. कपालहस्ता २६. रक्ताक्षी २७. शुकी २८. श्येनी २९. कपोतिका । ३०. पाशहस्ता ३१. दंडहस्ता ३२. प्रचंडचंडविक्रमा ।।५।।३३. शिशुघ्नी ३४.पापहंत्री च ३५. काली ३६. रुधिरपायिनी । ३७. वसाधया ३८. गर्भभक्षा ३९. शवहस्तांऽत्र ४०.मालिनी ।।६ ।। ४१.स्थूलकेशी ४२. बहत्कुक्षिः ४३. सर्पास्या ४४. प्रेतवाहना । ४५. दंदशूककरा ४६.क्रौंची ४७.मृगशीर्षा ४८.वृषानना ।।७।। ४९.व्यात्तास्या ५०.धूमानिःश्वासा ५१.व्योमैक च ५२.रणोध्र्वदृक् । ५३.तापनी ५४.शोषणीदृष्टिः ५५.कोटरी ५६.स्थूलनासिका ।।८।।५७. विद्युत्प्रभा ५८.बलाकास्या ५९. मार्जारी ६०. कटपूतना ।। ६१.अट्टाट्टहासा ६२.कामाक्षी ६३.मृगाक्षी

६४.मृगलोचना ॥९॥ नामानीनामानि यो मर्त्यश्चतु:षष्ठि दिने दिने । जपेत्त्रिसंधिं तस्येह दुष्टबाधा प्रशाम्यति ॥१०॥ न डाकिन्यो न शाकिन्यो न कूष्मांडा न राक्षसा:। तस्य पीडां (केऽपि) न कुर्वंति नामानीमानि य: पठेत् ॥११॥ शिशूनां शंतिकारीणि गर्भशांतिकराणि च । रणे राजकुले वापि विवादे जयदान्यापि ॥१२॥ लभेदभीप्सितां सिद्धिं योगिनीपीठ सेवक: । मंत्रांतराण्यपि जपंस्तत्पीठे सिद्धिभाग्भवेत् ॥१३॥ बलिपूजोपहारैश्च धूपदीपसमर्पणै: । क्षिप्रं प्रसन्ना योगिन्य: प्रयच्छेयुर्मनोरथान् ॥१४॥ शरत्काले महापूजां तथ कृत्वा विधानत: । हवीषि हुत्वा मंत्रज्ञो महतीं सिद्धिमाप्नुयात् ॥१५॥ आरभ्याऽऽश्वयुज:शुक्लां तिथिं प्रतिपदं शुभां । पूजयेन्नवमीं यावन्नरश्चिंतितमाप्नुयात् ॥१६॥ कृष्णपक्षस्य भूतायामुपवासी नरोत्तम: । तत्र जागरणं कृत्वा महतीं सिद्धिमान्पुयात् ॥१७॥ प्रणवादिचतुर्थ्यंतैर्नामभिर्भक्तिमान्नर:। प्रत्येकं हवनं कृत्वा शतमष्टोत्तरं निशि ॥१८॥ ससर्पिषा गुग्गुलना लघुकोलिप्रमाणत: । यां यां सिद्धिमभीप्सेत तां तां प्राप्नोति मानव: ॥१९॥ चैत्रकृष्णप्रतिपदि तत्र यात्रा प्रयत्नत:। क्षेत्रविघ्नप्रशांत्यर्थं कर्तव्या पुण्यकृज्जनै: ॥२०॥ यात्रां च सांवत्सारिकीं यो न कुर्यादवज्ञया । तस्य विघ्नं प्रयच्छंति योगिन्य: काशिवासिन: ॥२१॥ अग्रेकृत्वास्थिता: सर्वास्ता: काश्यां मणिकर्णिकां । तन्नमस्कारमात्रेण नरो विघ्नैर्न बाध्यते ॥२२॥ इति श्रीस्कंदपुराणे श्रीकाशीखंडे चतु:षष्ठियोगिन्या गमनं नाम पंचचत्वारिंशोऽध्याय: संपूर्ण: ।

॥ श्रीअमरेश्वरयोगिन्य:प्रसन्ना:संतु ॥

नरसिंहवाडीस जाऊया ..

नरसिंहवाडीस जाऊया । चरण गुरुचे पाहू या । कृष्णा सुपंचगंगा संगम । जिथे डोलती प्रभू कल्पद्रुम । महिमा त्यांची अगाध, अनुपम कृपेत त्यांच्या न्हावूया ॥१॥ औदुंबर वृक्षांची दाटी । त्यात मनोहर पदे गोमटी । विमल सौख्य बांधयागाठी गुरूपद हृदयी ध्याऊया ॥२॥ दत्तगुरू पद नित्यक्षाळिता ये कृष्णेला अतिपावनता । म्हणुनि भेटण्या ये जन्हूसुता, हे अभिनव सुख सेवूया ॥३॥ दर्शन घडता गुरुचरणांचे । शमन होतसे भवव्याधीचे जाळाया पर्वत पापांचे शरण तयाना जाऊया ॥४॥ नरसिंहवाडीचे हे वैभव । तिन्ही त्रिकाळी घडे महोत्सव । देव ऋषिमुनी करिती उत्सव म्हणति गुरुपदी नाचुया ॥५॥

- कवि : सुधांशु , औदुंबर.

पर्जन्यार्थ दत्ताची विनवणी (धांवा) चाल, पाळण्याची

द्यावा पर्जन्य । गुरुराया । प्रार्थिति सर्वहि प्रजा । आज्ञा करि बारे । इंद्रासी ।श्रीत्रयमूर्ति तरुतळवासी ॥धृ०॥ अवर्षण पडलें बा । क्षितिवरी । दैन्य सर्वांचे परिहरी । दु:ख तुजविण बा । कोणा सांगूं । पदर पसरुनी कवणा मागूं ॥द्यावा ॥१॥ पडतां दुष्काळ । मेदिनीं । मरती सर्वहि प्राणी । तुम्हाविण रक्षीता । आहे कोण । जाणुनि आलों दीन मी शरण ॥२॥ विश्वमनोरथ बा । करिं पूर्ण ॥ तूं भक्तवत्सल कल्पद्रुम जाणे। आतां कृपणता । कां धरिली। किंवा ब्रीदावळी हरलो ॥३॥ ऐकुनि विनंती । दयाळ। कळवळला प्रभु कृपाळ । वेगें आज्ञापी। वासवा । सृष्टिंत वृष्टी करवा ॥ ४ ॥ आज्ञा होतांची। लवे चपळा । उत्तरवातें अति घन वळला । वर्षे श्रीसत्ते । प्रचंड गुरुभक्ताशिरीं श्रीकर अखंड ॥ ५ ॥ द्यावा पर्जन्य ॥

ही विनवणी उत्तरा नक्षत्र संपल्यानंतर पर्जन्य पडेपर्यंत करावयाची असते. प्रतिवर्षी चातुर्मासारंभी एकदां हा विनवणीचा धांवा म्हणून पालखी दसऱ्यापर्यंत बंद ठेवण्याचा येथे प्रघात आहे.

श्रीगुरु पादुकाष्टक

ज्या संगतीने सुविराग झाला । मनोदरीचा जडभास गेला। साक्षात्परमात्मा मज भेटविला । विसरूं कसा मी गुरुपादुकाला ॥१॥ सद्योगपंथे घरि आणियेले । अंगचे माते परब्रह्म केलें । प्रचंड तो बोधरवी उदेला । विसरूं कसा मी गुरुपादुकाला ॥२॥ चराचरी व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची । पदोपदी संगम पूर्ण झाला ॥विस०॥३॥ जो सर्वदा गुप्त जनांत वागे । प्रसन्न भक्ता निजबोध सांगे । सद्भक्ति भावाकरिता भुकेला ॥वि०॥४॥ अनंत माझे अपराध कोटी। नाणी मनी घालुनि सर्व पोटी। प्रबोधिता त्या श्रम फार झाला ॥वि०॥५॥ कांही मला सेवनही न झालें । तथापि तेणे मम उद्धरिलें । आतां तरी अर्पिन प्राण त्याला ॥वि०॥६॥ माझा अहंभाव असे शरिरी । तथापि तो सद्गुरु अंगिकारी । नाही मनीं अल्प विकार झाला ॥वि०॥७॥ आतां कसा मी उपकार फेडूं। हा देह ओवाळुनि दूर सोडूं । म्यां एक भावे प्रणिप्रात केला ॥वि०॥८॥ जया वर्णिता वर्णिता वेदवाणी । म्हणे नेति नेति तिला जर दुरोनी । नव्हे अंत ना पार ज्याच्या रूपाला ॥वि०॥९॥ जो साधुच्या अंकित जीव झाला । त्याचा असे भार निरंजनाला ।नारायणाचा भ्रम दूर केला ॥ वि०॥१०॥


॥ अवधूतचिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥ शुभंभवतु ॥














Narasobawadi Nityapath
CHIDAMBAR ART
PRINTERS
EXCELLENCE IN PRINTING
Price:Rs.20/-